**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**परभणी कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार, दिनांक –२६ मार्च २०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २७ ते ३१ मार्च, २०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २७/०३ | २८/०३ | २९/०३ | ३०/०३ | ३१/०३ |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३८.० | ३८.० | ४०.० | ४२.० | ४३.० |
| किमान तापमान (अं.से.) | २१.० | २२.० | २४.० | २४.० | २३.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ३४ | ३३ | ३३ | ३३ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २९ | २६ | २६ | २६ | २६ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १० | ७ | ६ | १४ | १४ |
| वा-याची दिशा | ईशान्य | ईशान्य | दक्षिण | वायव्य | वायव्य |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक २७ मार्च ते ३१ मार्च २०२०१ दरम्यान आकाश स्वच्छ ते अंशत: ढगाळ राहील. जिल्हयात दोन दिवसानंतर कमाल तापमानात 2 ते 3 अं. से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| उन्हाळी भुईमूग | वाढीची अवस्था | पिकाच्या आवश्यकतेनुसार पिकात पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रस शोषण करणाऱ्या (फुलकिडे, मावा, तुडतुडे) किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के ०२ मिली किंवा थायमिथोकझाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % ०३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | काढणी अवस्था | काढणी न केलेल्या व काढणीस तयार असलेल्या रब्बी ज्वारी पिकाची काढणी व मळणी करून घ्यावी. |
| गहू | काढणी अवस्था | काढणी न केलेल्या व काढणीस तयार असलेल्या गहू पिकाची काढणी व मळणी करून घ्यावी |
| केळी | घड बाहेर पडणे अवस्था | केळी बागेत पाणी व्यवस्थापन करावे. केळी बागेतील कमळ फुल काढावे. |
| आंबा | फळ वाढीची अवस्था | आंबा फळबागेत पाणी व्यवस्थापन करावे. फळ गळ होऊ नये म्हणून जिब्रॅलीक ॲसीड 1.5 ग्राम 100 लिटर पाण्यात मिसळून वारणी करावी. |
| द्राक्षे | काढणी अवस्था | काढणीस तयार असलेल्या द्राक्ष घडांची काढणी करून घ्यावी. |
| भाजीपाला | वाढीची/काढणी अवस्था | नवीन लागवड केलेल्या भाजीपाला पिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे.काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करावी. भाजीपाला पिकात (मिरची, वांगी, भेंडी) रसशोषन करणा-या किडींच्या व्यवस्थापनासाठी पायरीप्रॉक्झीफेन ५ % + फेनप्रोपॅथ्रीन |

| | | |
|---|---|---|
| | | १५ % १० मिली किंवा डायमिथोएट ३० % १३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. |
| फुल शेती | वाढीची/काढणी अवस्था | नवीन लागवड केलेल्या फुल पिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे.काढणीस तयार असलेल्या फुल पिकांची काढणी करावी. |
| तुती रेशीम उद्योग | -- | यशस्वी कोष उत्पादनासाठी तुती पानांचा वाटा 38 % असून किटक संगोपन गृहातील तापमान व आद्रतेचा वाटा 37 % असतो तर एकूण कोष उत्पादनाच्या खर्चापैकी 60 %खर्च हा तुती पाने उत्पादनासाठी होतो. उर्वरीत खर्च कीटक संगोपन आणि कोकाढणी व बाजारपेठ यासाठी होतो. |
| सामुदायिक विज्ञान | - | स्वस्थ जीवनासाठी आश्यक बाबी : दररोज संतुलीत आहार घ्या. दिवसभरात 8 ते 10 ग्लास पाणी प्या. आहारात साखर आणि मीठाचा वापर कमी करा. तेल आणि मसालेदार पार्थांचा वापर कमी करा. सकाळची न्याहरी करण्यास कधीच टाळाटाळ करु नका. जेवणाच्या वेळा नियमितपणे पाळा. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा जनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**